नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd
अंक - ३४६ | Issue - 346
वार सोमवार दि. ५ मे २०२५ | Blow- Monday Date 5 May 2025
ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com
वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com
पाने - ४ | Pages - 4
किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs
पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026
ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## वॉटर स्ट्राईक; भारताने पाकला जाणारे चिनाब धरणाचे पाणी रोखले

### पाकिस्तानसमोरील समस्येत वाढ होणार; मोठ्या कारवाईने पाकिस्तान बिथरले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानविरोधात आक्रमक धोरण अवलंबले आहे. सिंधू नदी पाणी वाटपाचा करार रद्द करत मोठे पाऊल टाकल्यानंतर आता सरकारने अजून एक वॉटर स्ट्राइक केला आहे. भारताने चिनाब नदीवरील बगलिहार धरणाच्या माध्यामातून पाण्याचा प्रवाह रोखला आहे. झेलम नदीवरील किशनगंगा धरणाद्वारे पाणी रोखण्याची तयारी सुरू केली आहे. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, जम्मूमधील रामबन येथील बगलिहार जलविद्युत धरण आणि उत्तर काश्मीरमधील किशनगंगा जलविद्युत



धरण भारताला पाणी सोडण्याच्या वेळेचे नियमन करण्याची क्षमता देतात.

काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. जागतिक बँकेच्या मध्यस्थतेने १९६० मध्ये झालेल्या सिंधू नदी पाणी वाटप करार रद्द केला. चिनाब नदीचा प्रवाह नियंत्रित केल्याने पाकिस्तानसमोरील समस्येत वाढ होणार आहे. झेलम नदीच्या पाण्याला रोखल्यास शत्रू राष्ट्राची परिस्थिती अत्यंत बिकट होणार असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. बगलिहार धरणावरुन दोन्ही देशांमध्ये अनेक वर्षापासून वाद सुरू आहेत. पाकिस्तानने या प्रकरणात जागतिक बँकेने मध्यस्थता करण्याची मागणी केली आहे. पाकिस्तान किशनगंगा धरणावरुन विशेषत:झेलमची उपनदी नीलमवर होत असलेल्या प्रभावामुळे विरोध करत आहे. वॉटर स्ट्राइक, व्यापारबंदी अशा अनेक प्रकारे भारत पाकिस्तानला कोंडीत पकडत आहे.


भारतीय सैन्य दलाकडूनही लवकरच मोठे पाऊल उचलले जाण्याची शक्यता आहे. नौसेनेच्या प्रमुखांनी पंतप्रधानांची भेट घेतल्यानंतर आज वायुसेनेच्या प्रमुखांनी पीएम मोदींची भेट घेतली आहे. सरकारकडून सैन्यदलांना प्रत्युत्तर देण्यासाठी पूर्ण स्वातंत्र्य दिले आहे. पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या एक दिवसानंतर सुरक्षा मंत्रिमंडळ समितीची (सीसीएस) बैठक झाली. सरकारने दहशतवादाचा नाश करण्याच्या भारताच्या राष्ट्रीय संकल्पाचा पुनरुच्चार केला आहे. सरकारने म्हटले आहे की दहशतवादी हल्ल्यासाठी जबाबदार असलेल्यांना आणि कट रचणाऱ्यांना कठोर शिक्षा होईल. विरोधीपक्षांसोबतही सरकारची बैठक झाली होती. त्यावेळी विरोधीपक्षांनी सरकारला दहशतवादाविरुद्ध लढण्यासाठी पूर्ण समर्थन दिले होते.

## दहशतवादाविरोधात कारवाईची जबाबदारी आमची : संरक्षणमंत्री राजनाथ सिंह

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्यावर आक्रमक पवित्रा घेतला आहे. ते म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात देशवासियांची इच्छा पूर्ण होणार आहे. दिल्लीमध्ये आयोजित संस्कृती जागरण महोत्सवात बोलताना राजनाथ सिंह यांनी सद्य स्थितीवर भाष्य केले आहे. 'तुम्ही सर्व पंतप्रधानांना चांगले जाणता, त्यांची कार्यशैली आणि दृढ निश्चयाशी परिचित आहात.' असे म्हणत देशवासीयांना आश्वस्त केले की, पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात जी तुम्ही अपेक्षा करणार, ती निश्चित स्वरुपात होणार आहे.

संरक्षण मंत्र्यांनी पहलगाम हल्ल्याच्या प्रत्युत्तरावर जोर देत म्हटले की, भारतीय सीमांची सुरक्षा आणि दहशतवादी हल्ल्याला सडेतोड उत्तर देण्याची



आमची जबाबदारी आहे. त्यांनी असेही नमूद केले की, संरक्षण मंत्री म्हणून माझे कर्तव्य आहे की, मी आपल्या जवानांच्या साथीने देशाच्या सीमांचे रक्षण करु आणि जे कोणी आपल्या देशावर हल्ला करण्याची हिंमत करतील, त्यांना सडेतोड प्रत्युत्तर देऊ.'

राजनाथ सिंहांनी पुढे नमूद केले की, भारताची ताकद ही केवळ सशस्त्र सेनेमध्ये नाही तर संस्कृती आणि अध्यात्मिकता यामध्येही प्रतिबिंबित होते. आपले वीर जवान भारताच्या भौतिक सीमांचे संरक्षण करतात. त्याचवेळी संत आणि ऋषीमुनी मात्र देशाच्या आध्यात्मिकतेचे संरक्षण करतात. एकीकडे जवान रणभूमीवर लढाई करतात, तर दुसरीकडे संत जीवनभूमीवर संघर्ष करत असतात.

२२ एप्रिलला जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये रक्तपात पाहायला मिळाला. २६ निष्पाप पर्यटकांचा मृत्यू झाला. या हल्ल्याची जबाबदारी लष्कर-ए-तोयबाशी संलग्नित असणाऱ्या रेजिस्टेंस फ्रंटने घेतली आहे. यानंतर भारताने पाकिस्तानविरोधात कठोर भूमिका घेतली आहे. तर पंतप्रधान मोदींनीही भारतीय सेनेने पाकिस्तानला सडेतोड प्रत्युत्तर देण्यासाठी खुली सूट दिली आहे. आता संरक्षण मंत्र्यांनीही त्यांचीच री ओढत सडेतोड प्रत्युत्तरात मोठ्या कारवाईचे संकेत दिले आहेत.

## जम्मू-काश्मीरमध्ये मोठी दुर्घटना, सैनिकांचं वाहन ७०० फूट खोल दरीत कोसळलं, ३ जवानांचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

श्रीनगर: जम्मू-काश्मीरमध्ये एक दुःखद घटना घडली आहे. रामबन जिल्ह्यात रविवारी एक मोठा अपघात झाला. जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्गावर सैनिकांची गाडी रस्त्यावरून घसरली. ती जवळपास ७०० फूट खोल दरीत कोसळली. या अपघातात भारतीय लष्कराच्या तीन जवानांचा मृत्यू झाला आहे.अधिकाऱ्यांनी माहिती दिली की, सैनिकांचा ट्रक छक-४४ या महामार्गावरून जात होता. हा ट्रक जम्मू-श्रीनगरला जाणाऱ्या सैनिकांच्या ताफ्यातील एक भाग होता. अपघात झाल्यानंतर लगेच मदत आणि बचाव कार्य सुरू करण्यात आले. पोलिसांनी या घटनेची ऋखठ दाखल केली आहे.

एका अधिकाऱ्याने सांगितले की, जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्गावर रामबन जिल्ह्यातील बॅटरी चश्माजवळ चालकाचा गाडीवरील ताबा सुटला. त्यामुळे गाडी थेट दरीत कोसळली. या दुर्घटनेत तीन जवान जागीच ठार झाले.सैन्य, पोलीस, डऊछठ्ठ आणि स्थानिक स्वयंसेवकांनी एकत्र येऊन तातडीने बचाव मोहीम सुरू केली. अपघातात मृत्युमुखी पडलेल्या तीन जवानांची ओळख पटली आहे. अमित कुमार, सुजीत कुमार आणि मान बहादुर नावे आहेत.

गेल्या काही दिवसांपासून जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्गावरील रामसू-रामबन भागात खूप पाऊस पडत आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी भूस्खलन झाले आहे. भूस्खलनामुळे काही ठिकाणी रस्ते वाहून गेले आहेत. महामार्गाची दुरुस्ती करून तो वाहतुकीसाठी परत सुरू करण्यात आला आहे. तरीही, ४० किलोमीटरपेक्षा जास्त लांबीचा रामबन-रामसू पट्टा अजूनही धोकादायक आहे. हा जवळपास ३०० किलोमीटर लांबीच्या महामार्गाचा एक कमजोर भाग आहे.जमिनीने वेढलेल्या काश्मीर खोऱ्यासाठी सैन्य आणि इतर आवश्यक वस्तूंचा पुरवठा याच महामार्गावरून होतो. हा महत्त्वाचा रस्ता काही काळासाठी बंद राहिला, तर खोऱ्यात पेट्रोल, खाद्यपदार्थ आणि इतर गरजेच्या वस्तूंची कमतरता निर्माण होते.

डिसेंबर २०२४ मध्ये पुंछमधील मेंढर सब-डिव्हिजनच्या बलनोई भागात भारतीय लष्कराचे वाहन खोल दरीत कोसळले होते. त्यावेळी ५ जवान शहीद झाले होते, तर ५ गंभीर जखमी झाले होते. त्यावेळी सैनिकांची गाडी ३०० फूट खोल दरीत पडली होती.

## २०२७मध्ये जातनिहाय जनगणना होणार; चंद्रशेखर बावनकुळेंची माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : 'दर दहा वर्षांनी जनगणना केली जाते. देशात १३०० अनुसूचित जाती आणि ८७५ अनुसूचित जमाती आहेत. या सगळ्यांचे दर दहा वर्षांनी आर्थिक, सामाजिक सर्वेक्षण केंद्र सरकार करते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भटक्या विमुक्त जाती आणि जमातींसाठी जातनिहाय जनगणनेचा निर्णय घेतला आहे. २०२७मध्ये जातनिहाय जनगणना होणार आहे,' अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी रविवारी दिली. केंद्र सरकारने जनगणनेची घोषणा करताना तारखेचा तपशील जाहीर केलेला नसताना बावनकुळे यांनी ही घोषणा केली.

महसूल विभाग, भटके विमुक्त परिषद आणि जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या वतीने विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील नागरिकांना जातीच्या दाखल्यांचे वितरण बावनकुळे यांच्या हस्ते फर्ग्युसन महाविद्यालयातील ॲम्फी थिएटर येथे करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार विजय शिवतारे, बापू पठारे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, अतिरिक्त जिल्हाधिकारी सुहास मापारी, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, परिषदेचे प्रदेशाध्यक्ष उद्धवराव काळे, कार्याध्यक्ष संजय पुरी उपस्थित होते.

'अनुसूचित जाती आणि जमाती यांच्यासह पालावर राहणाऱ्या भटक्या विमुक्त जातींची जातनिहाय



जनगणना व्हावी, अशी मागणी होती. कुठला समाज कुठे राहतो, किती संख्येने आहे, कशा पद्धतीने राहतो यासाठी सामाजिक-आर्थिक सर्वेक्षण आवश्यक आहे. पालावर राहणारा समाज आर्थिकदृष्ट्या अशक्त आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक भटक्या जमातीतील नागरिकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्य सरकार प्रयत्न करीत आहे,' असे बावनकुळे यांनी सांगितले. 'येत्या दोन वर्षांत विमुक्त जाती व भटक्या जमातीतील एकही नागरिक समाजाच्या मुख्य प्रवाहाच्या बाहेर राहणार नाही, त्यांच्या न्याय व हक्काचे उल्लघंन; तसेच त्यांच्यावर अन्याय होणार नाही, यादृष्टीने समाजाच्या शेवटच्या व्यक्तीसाठी प्रशासनाने काम करावे,' अशी सूचना त्यांनी केली.

डुडी म्हणाले, 'कातकरी समाजाला १५ हजार जातीचे दाखले, १६ हजार आधारकार्ड जिल्हा प्रशासनाच्या वतीने देण्यात आले आहेत. जिल्ह्यातील २२०० कातकरी समाजातील कुटुंबीयांना स्वतःच्या मालकीची जागा नसल्याने ते पंतप्रधान आवास योजनेपासून वंचित राहिले होते. तीन महिन्यांत ७५० कुटुंबीयांना गायरान जमीन दिली आहे. त्यांना पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घरे देण्यात आली आहेत. जिल्हा प्रशासन केवळ दाखले देऊन थांबणार नाही, तर सरकारच्या योजना पोहोचविणार आहे.' 'भटके विमुक्त जाती जमाती सधन होत्या. ब्रिटिशांच्या कुटनीतीमुळे ते मुख्य प्रवाहापासून दूर गेले,' असे काळे यांनी सांगितले.

'भटक्या विमुक्तांना छळणाऱ्यांची बढती रोखणार' 'श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर घेणाऱ्या आणि न घेणाऱ्या नायब तहसीलदारांची नावे मागून घेणार आहे. भटक्या विमुक्त जातींना विकासाचा केंद्रबिंदू समजून काम केले पाहिजे. त्यांना छळणाऱ्या अधिकाऱ्यांची गोपनीय अहवालात नोंद केली जाईल आणि त्यांची बढती रोखली जाईल,' असा इशारा चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला.

## काँग्रेसच्या चुकांची जबाबदारी मी स्वीकारतो; राहुल गांधींचं मोठं विधान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : 'काँग्रेसने अनेक चुका केल्या, त्या वेळी मी पक्षात नव्हतो; पण पक्षाने इतिहासात जे काही चुकीचे केले त्याची जबाबदारी मी आनंदाने स्वीकारेन,' असे वक्तव्य काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केले. सन १९८४च्या दंगली आणि काँग्रेसचे शीख समुदायासोबत असलेले संबंध याबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी हे भाष्य केले.

राहुल गांधी यांनी २१ एप्रिल रोजी अमेरिकेतील 'ब्राउन युनिव्हर्सिटीत वॉटसन इन्स्टिट्यूट फॉर इंटरनॅशनल अ‍ॅण्ड पब्लिक अफेअर्स' येथे संवाद साधला. या कार्यक्रमाचा व्हिडीओ संस्थेने शनिवारी आपल्या यूट्युब चॅनेलवर अपलोड केला. 'शीख समुदायाशी सामंजस्य साधण्याचे कोणते प्रयत्न तुम्ही करत आहात,' असा प्रश्न या कार्यक्रमात एका शीख विद्यार्थ्याने राहुल यांना विचारला. यावेळी त्याने राहुल यांनी आपल्या आधीच्या दौऱ्यादरम्यान केलेल्या टिप्पणीचाही उल्लेख केला. 'भारतात शिखांना पगडी परिधान करण्याची परवानगी असेल की नाही, याबाबत मी लढा देत आहे,' असे ते यावेळी म्हणाले होते. या प्रश्नावर राहुल यांनी उत्तर दिले. 'शीख कोणत्या गोष्टीला घाबरतात, असे मला वाटत नाही. लोक आपला धर्म व्यक्त करताना अस्वस्थ असतील, असा भारत आपल्याला हवा आहे का? काँग्रेस पक्षाच्या चुकांबाबत बोलायचे झाले, तर मी नसताना अनेक चुका झाल्या; पण काँग्रेस पक्षाने इतिहासात जे काही चुकीचे केले, त्याची जबाबदारी मी आनंदाने स्वीकारतो,' असे त्यांनी स्पष्ट केले.

### आधी पर्यटकांत मिसळले आणि फूड कोर्टमध्ये जमवले

### अधिकाऱ्यांकडून मोठा खुलासा

## पहलगाम हल्ल्यातील चार दहशतवाद्यांपैकी दोन काश्मिरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर संपूर्ण देशात संतापाचे वातावरण आहे. या हल्ल्यात २६ निष्पाप पर्यटकांना आपला प्राण गमवावा लागला आहे. पर्यटकांचा धर्म विचारल्यानंतर दहशतवाद्यांनी त्यांना लक्ष्य केल्याचे प्रत्यक्षदर्शी सांगतात. एुळींहनआयए या हल्ल्याचा तपास करत आहे. दरम्यान, दहशतवाद्यांबद्दल एक मोठा खुलासा झाला आहे. पहलगाम हल्ल्यात सहभागी असलेल्या चार दहशतवाद्यांपैकी दोघे जम्मूतील कठुआ बाजूने भारतात परतले होते आणि हल्ल्यापूर्वी पर्यटकांमध्ये मिसळले, त्यानंतर त्यांनी पर्यटकांना एका फूड कोर्टमध्ये जमवले होते, अशी माहिती एका अधिकाऱ्यांनी दिली आहे.

इंडियन एक्सप्रेसच्या वृत्तानुसार, पहलगाम हल्ल्यातील चार दहशतवाद्यांपैकी दोघेजण दक्षिण काश्मीरमधील होते. ते यापूर्वी अटारी सीमेवरून पाकिस्तानला गेले होते. पण ते भारतात कधी परतले याची कोणतीही नोंद नाही. ते जम्मूतील कठुआ मार्गे भारतात परतले, असे मानले जाते. दहशतवादी पहलगाम मध्ये आले आणि पर्यटकांमध्ये मिसळले आणि त्यांना फूड कोर्टमध्ये गोळा केले. यानंतर, इतर दोन दहशतवाद्यांनी पर्यटकांना त्यांच्या धर्माबद्दल विचारले आणि गोळीबार केला. गोळीबार करणारे दहशतवादी पाकिस्तानचे होते.

एका अधिकाऱ्याने अशी माहिती दिली की, दहशतवादी ४ ते ५ दिवसांपासून बैसरनच्या आसपास रेकी करत होते. स्थानिक लोकांच्या मदतीशिवाय हे शक्य नव्हते. वायरलेस चॅट्समधून मिळालेल्या गुप्तचर माहितीवरून असेही दिसून आले की, दहशतवादी त्याच भागात होते. पण त्यांच्या संवादाचे प्रकार वेगवेगळे असल्याने संभाषण समजू शकलेले नाही. सशस्त्र दहशतवादी मुक्तपणे फिरत आहेत, याची सरकारला चिंता आहे. सुरक्षा दलांनी चकमकीच्या ठिकाणांवरून स्नायपर रायफल्स, एम-सिरीज रायफल्स आणि चिलखत छेदणाऱ्या गोळ्यांसारखी आधुनिक शस्त्रे जप्त केली आहेत. ही अफगाणिस्तानातील नाटो सैनिक दलातील उरलेली शस्त्रे असल्याचा संशय आहे.

या दहशतवादी हल्ल्यापूर्वी सुरक्षा यंत्रणांना या धोक्याची माहिती मिळाली होती. अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, त्यांना माहिती मिळाली होती की श्रीनगरमधील हॉटेलमध्ये राहणाऱ्या पर्यटकांना लक्ष्य केले जाऊ शकते. याच पार्श्वभूमीवर, डल लेक आणि मुघल गार्डनभोवती सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली होती. हल्ल्याच्या काही दिवस आधी वरिष्ठ पोलिस अधिकारीही खोऱ्यात तळ ठोकून होते. श्रीनगरच्या बाहेरील भागात असलेल्या हॉटेलवर हल्ला होऊ शकतो, असा अधिकाऱ्यांचा अंदाज होता. म्हणून, पहलगाम हल्ल्यापूर्वी, दाचीगाम, निशात आणि आसपासच्या भागात १०-१५ दिवस शोध मोहीम राबवण्यात आली होती, असेही अधिकाऱ्यांनी सांगितले.



दैनिक
यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### पाकला दणका

वॉटर स्ट्राइक, व्यापारबंदी अशा अनेक प्रकारे भारत पाकिस्तानला कोंडीत पकडत आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानविरोधात आक्रमक धोरण अवलंबले आहे. सिंधू नदी पाणी वाटपाचा करार रद्द करत मोठे पाऊल टाकल्यानंतर आता सरकारने अजून एक वॉटर स्ट्राइक केला आहे. भारताने चिनाब नदीवरील बगलिहार धरणाच्या माध्यामातून पाण्याचा प्रवाह रोखला आहे. झेलम नदीवरील किशनगंगा धरणाद्वारे पाणी रोखण्याची तयारी सुरू केली आहे. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, जम्मूमधील रामबन येथील बगलिहार जलविद्युत धरण आणि उत्तर काश्मीरमधील किशनगंगा जलविद्युत धरण भारताला पाणी सोडण्याच्या वेळेचे नियमन करण्याची क्षमता देतात. काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. जागतिक बँकेच्या मध्यस्थतेने १९६० मध्ये झालेल्या सिंधू नदी पाणी वाटप करार रद्द केला. चिनाब नदीचा प्रवाह नियंत्रित केल्याने पाकिस्तानसमोरील समस्येत वाढ होणार आहे. झेलम नदीच्या पाण्याला रोखल्यास शत्रू राष्ट्राची परिस्थिती अत्यंत बिकट होणार असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. बगलिहार धरणावरुन दोन्ही देशांमध्ये अनेक वर्षापासून वाद सुरू आहेत. पाकिस्तानने या प्रकरणात जागतिक बँकेने मध्यस्थता करण्याची मागणी केली आहे. पाकिस्तान किशनगंगा धरणावरुन विशेषत:झेलमची उपनदी नीलमवर होत असलेल्या प्रभावामुळे विरोध करत आहे.

# १०० दिवसाच्या विशेष मोहिमेमध्ये एकूण ३ हजार २४७ सनद वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : राज्य शासनाच्या प्रशासकीय विभागांसाठी १०० दिवसांचा कृति आराखडा निश्चित करणेत आला आहे. त्याच धर्तीवर क्षेत्रीय कार्यालयांकरीता देखील १०० दिवसांमध्ये नागरिकांच्या काही महत्वाच्या विषयांवर मोहिम घेऊन कार्यवाही करण्याचे निर्देश देणे आवश्यक होते. त्यामध्येच पोटखराब क्षेत्र लागवडीखाली आणले असल्यास त्याप्रमाणे ७/१२ सदरी पोटखराब क्षेत्र कमी करुन लागवडीलायक क्षेत्रात वाढ करणेच्या सविस्तर सूचना दिनांक १३ मार्च २०२५ रोजी परिपत्रक काढून देणेत आले आहेत.

जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख, पुणे यांचे दिनांक १९ ऑगस्ट २०१९ रोजीच्या परिपत्रकानुसार महसुली गावातील जमीनधारकाने पोटखराब वर्ग (अ) ची जमीन लागवडीखाली आणल्यास अतिरिक्त आकारणी करावयाच्या कार्यपध्दती बाबत निर्देश दिले आहेत.

या परिपत्रकानुसार जास्तीत जास्त क्षेत्र लागवडीखाली आणणे हा उद्देश आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडील परिपत्रक दिनांक १३ मार्च २०२५ अन्वये पोटखराब क्षेत्र लागवडीखाली आणणेकामी महसूली अधिकारी व प्राधिकारी यांना कार्यपध्दतीबाबत कालबध्द कार्यक्रम हाती घेण्यात आलेला आहे.

पोटखराब वर्ग (अ) मधील क्षेत्र लागवडीखाली आणल्यास अतिरिक्त आकारणी करणेचे अधिकार तहसिलदार यांना प्रदान करणेत आले असून तहसिलदार यांचेस्तरावर तालुकास्तरीय समिती स्थापन करुन विशेष मोहिम राबविणेबाबत निर्देश दिले होते.

त्यानुसार संबंधित तहसिलदार व उपविभागीय अधिकारी यांनी अत्यंत चांगल्या प्रकारे विशेष मोहिम राबवून लागवडीखालील पोटखराब गटाची संख्या ५०८२ (क्षेत्र २४८०.४८ हे.आर) शोध घेवून त्यापैकी २८८८ गट (क्षेत्र १३४०.७७ हे. आर) लागवडीखली आणलेबाबत आदेश पारित केलेले आहेत. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यामध्ये सदर विषयाबाबत अत्यंत चांगले काम झालेले आहे.

ही मोहिम प्रभावीरित्या राबविण्यात आलेमुळे पोटखराब क्षेत्र लागवडीखाली आल्यामुळे लागवडीखालील क्षेत्राच्या आकारणीच्या प्रमाणत वाढ होऊन महसूली उत्पन्नात वाढ होणार आहे. तसेच जमिनीमध्ये सुधारणा केल्यामुळे त्याच्या जमिनीच्या मूल्यात देखील वाढ होण्यास मदत होईल.

अंतिम विकास आराखडा उज्ञ मंजूर असलेल्या भागामध्ये ४२ प्रमाणे प्रादेशिक व प्रारुप विकास आराखडा मंजूर असलेलया ४२क प्रमाणे व कोणत्याही गावठाणाच्या हद्दीपासून २००मी च्या आतील क्षेत्राकरीता ४२ड प्रमाणे अकृषिक वापराची सनद देणेत येते.

सदरच्या सनद प्रदान केल्यामुळे संबंधित जमीनधारकांना वेगळयाने अकृषिक परवानगी घेण्याची गरज गहत नाही. शासनाच्या १०० दिवस कृति आराखडा कार्यक्रमा पूर्वी सन २०१७ ते सन २०२४ पर्यंत ४२ब, ४२क व ४२ड मध्ये एकूण १२ हजार २४१ सनद प्रदान करणेत आलेल्या होत्या. शासनाच्या १०० दिवस कृति आराखडा कार्यक्रमामध्ये विशेष मोहिम घेऊन सोलापूर जिल्हयात तहसिलदार व उपविभागीय अधिकारी यांनी एकूण ४० शिबीर घेण्यात आले.

सोलापूर जिल्हयात ४२ब, ४२क व ४२ड च्या १०० दिवसाच्या विशेष मोहिमेमध्ये एकूण ३ हजार २४७ सनद वाटप करण्यात आले आहे. सनद प्रदान केलेमुळे जमीन महसूलात वाढ होवून संबंधित मिळकतधारकांना त्यांचे मिळकतीमध्ये अकृषिक वापर सुरु करणेस सुलभ झाले आहे, अशी माहिती जिल्हा प्रशासनाच्या वतीने देण्यात आलेली आहे.

# सांगोला तालुक्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांनी तालुक्यातील पोलीस पाटील यांना केले मार्गदर्शन





पंढरपूर/प्रतिनिधी : सांगोला तालुक्यात आपापल्या गावी चोरी होऊ नये यासाठी पोलीस मित्र करून रात्री पोलिसासह प्रभावीपणे अगस्त करावी व नूतन पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांनी तालुक्यातील पोलीस पाटील यांना मार्गदर्शन केले.

पोलीस प्रशासनामध्ये काम करत असताना जनहिताचे पॉलिशिंग राबवण्यामध्ये पोलीस पाटील यांची भूमिका महत्त्वाची असते जनता आणि पोलीस यांच्यामधील दुवा म्हणजे पोलीस पाटील आहे, असे प्रतिपादन नूतन पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांनी केली व शुक्रवारी दिनांक दोन मे रोजी पंचायत समिती बचत भवन येथे पोलीस पाटील यांच्या बैठकीमध्ये ते बोलत होते. यावेळी पोलीस पाटील संघटनेचे राज्य अध्यक्ष दिलीप पाटील कार्यकारणी सदस्य आले म्हसोबा पाटील व सौ रेखावताडे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख प्रभाकर कांबळे, तालुका अध्यक्ष गणेश आटकळे महिला अध्यक्ष सुरेखा खांडेकर आधी पदाधिकारी व पोलीस पाटील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भिवंडी वकील संघटनेच्या अध्यक्ष पदासाठी ॲड. किरण चन्ने रिंगणात




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

भिवंडी शहरात दिवाणी व फौजदारी न्यायालयात गेल्या दोन वर्षापासून भिवंडी वकील संघटना कार्यरत होती आगामी ७ मे रोजी पुन्हा वकील संघटनेची द्विवार्षिक निवडणूक होणार असून त्या पार्श्वभूमीवर वकिलांची गेट टुगेदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

भिवंडी वकिल संघटने मार्फत दोन वर्षांनंतर निवडणूक होत असुन भिवंडी वकिल संघटनेचे नवनिर्वाचित अध्यक्ष तर कोर कमीटी पद स्वीकारत असतात दोन वर्षात नव नवीन सदस्यांना प्राधान्य दिले जात असते त्यातच ७ मे रोजी भिवंडी वकील संघटनेची निवडणूक होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर भिवंडी वकील संघटना द्विवार्षिक निवडणूक २०२५/२०२७ ह्या वर्षाकारिता परिवर्तन पॅनेल कडून ऍडव्होकेट किरण चन्ने अध्यक्ष पदाकरिता निवडणूक लढवीत आहेत तर उपाध्यक्ष ऍड सुधीर भोईर, सचिव ऍड अभिशेख भोई, खजिनदार ऍड कल्पेश पाटील सहसचिव ऍड अजरा मोमीन हे सर्व उमेदवार परिवर्तन पॅनेल मधून निवडणूक लढवत आहेत..

या गेट-टुगेदर कार्यक्रमासाठी तब्बल ८०० हून अधिक महिला व पुरुष वकील सहभागी झाले होते,तसेच सुप्रसिद्ध गायक चंद्रकांत शिंदे यांची गाण्याची मैफिल रंगली होती.

# कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंध अधिनियम २०१३ अन्वये समिती स्थापन करण्याचे आवाहन

सोलापूर (जिमाका) : सर्वोच्च न्यायालयाने Writ pition civil 1224/2017 मध्ये सदर अधिनियमाच्या अमलबजावणी बाबत राज्य शासनाला निर्देश दिलेले आहेत.

कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम २०१३ ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी झींह लीं मधील कलम ४ अन्वये ज्या आस्थापना मध्ये १० किंवा १० पेक्षा जास्त कर्मचारी असतील आशा सर्व खाजगी अस्थापनामध्ये अंतर्गत तक्रार समिती स्थापन करणे बंधनकारक आहे.

त्याकरीता सर्व खाजगी अस्थापनाना आवाहन करण्यात येते की, १० किंवा १० पेक्षा जास्त कर्मचारी असतील अशा खाजगी आस्थापनांनी महिला व बाल विकासाच्या SHE BOX PORTL (HTTPS://SHEBOX. WCD.GOV.IN/) वर जाऊन अंतर्गत तक्रार निवारण समिती स्थापनेबाबत नोंद करावी कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम २०१३ अन्वये समिती स्थापन न केल्यास ५० हजार रुपये पर्यंत दंड केला जाईल याची नोंद घ्यावी. तसेच सदर समिती गठीत करण्याबाबत अथवा कायदयाबाबत अधिकची माहिती पाहिजे असल्यास जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, शोभानगर, बिगबाजाराच्या पाठीमागे, सातरस्ता सोलापूर येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी आर.बी.काटकर यांनी केले आहे.

# सुपतगाव येथे महात्मा बसवेश्वर जयंती निम्मित उत्साहात मिरवणूक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी



तालुक्यातील सुपतगाव येथे जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या जयंतीनिमित्त शुक्रवारी (दि. २) रोजी भव्य मिरवणूकीने उत्सवाची सांगता करण्यात आली. प्रारंभी हनुमान चौकात मान्यवरांच्या हस्ते ध्वजरोहन करण्यात आले. त्यानंतर महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. तसेच रात्री भारूडाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सर्वांना महादेव मातोळे यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

गावातील प्रमुख मार्गांवरून ही मिरवणूक पार पडली.हा जयंती उत्सव यशस्वी पार पाडण्यासाठी अध्यक्ष नागनाथ हेंडले, उपाध्यक्ष निळकंठ लामजणे, ज्ञानेश्वर जगदाळे, महादेव बिराजदार,रतन लामजणे,खंडपा हेंडले, शिवराज जगदाळे,रवी करके, ज्ञानेश्वर लामजणे यांच्यासह सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

## माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रात भारताला जागतिक नेतृत्व बनवण्याचा पंतप्रधानांचा दृष्टिकोन

**केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव**

# ‘आयआयसीटी’ची स्थापना भारतासाठी महत्त्वाची




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भारताच्या एव्हीजीसी-एक्सआर परिसंस्थेला सक्षम बनवण्याच्या दिशेने एक मोठी झेप घेत, माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने, फिक्की आणि सीआयआयच्या सहकार्याने, केवळ एव्हीजीसी-एक्सआर क्षेत्रासाठी समर्पित इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी (आयआयसीटी) - एक राष्ट्रीय उत्कृष्टता केंद्राची स्थापना केली आहे. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या धोरणात्मक सहकार्याला औपचारिकरित्या हिरवा झेंडा दाखवला.

त्यांनी माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रात जागतिक नेतृत्व बनण्याच्या भारताच्या क्षमतेवर भर दिला आणि सांगितले की, तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन शिक्षणात आयआयटी आणि आयआयएम ज्या प्रकारे मापदंड बनले आहेत त्याचप्रमाणे आयआयसीटी या क्षेत्रातील एक प्रमुख संस्था बनण्याच्या मार्गावर आहे.

वेव्हज २०२५ च्या उद्घाटनप्रसंगी करण्यात आलेल्या घोषणेला मुंबईत सुरू असलेल्या वेव्हज शिखर परिषदेदरम्यान केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी औपचारिक रूप दिले. केंद्रीय मंत्र्यांनी सांगितले की, एव्हीजीसी-एक्सआर क्षेत्रातील व्यावसायिक बनू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एक मोठे जागतिक दर्जाचे शिक्षण आणि प्रशिक्षण केंद्र म्हणून स्वतःला प्रस्थापित करण्यासाठी आयआयसीटी भारतातील आयआयटी आणि आयआयएमच्या कार्यपद्धतीचे अनुसरण करेल.

चित्रपट आणि मनोरंजन विश्वात पूर्णपणे नवीन असा उपक्रम सुरू करणे. हा (उपक्रम) माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रात भारताला जागतिक नेतृत्व बनविण्याचा प्रधानमंत्री यांचा दूरदृष्टिकोन असल्याचे वैष्णव म्हणाले. सहकार्य करण्याची तयारी दर्शविणाऱ्या उद्योग भागीदारांचे त्यांनी मनापासून आभार मानले. आघाडीच्या जागतिक कंपन्यांनी अभ्यासक्रम विकास, इंटर्नशिप, शिष्यवृत्ती, स्टार्टअपना निधीपुरवठा आणि नोकरी मिळवून देण्यासाठी मदत करण्यासाठी आयआयसीटीसोबत भागीदारी करण्यास सहमती दर्शवल्याचे त्यांनी जाहीर केले.

या उपक्रमासाठी आमच्यासोबत भागीदारी करण्याची तयारी दर्शविल्याबद्दल मी सर्व उद्योग भागीदारांचे आणि त्यांच्या वरिष्ठ व्यवस्थापनाचे त्यांनी आभार मानले. ते म्हणाले की, ही संस्था उभी करण्यात आणि दीर्घकालीन वाढ टिकवून ठेवण्यास मदत करतील. मला आशा आहे की, आयआयसीटी (तत्रब्छ-दठ) क्षेत्रासाठी एक मोठी शैक्षणिक पायाभूत सुविधा बनेल. आम्ही आमच्या देशातील आयआयटी आणि आयआयएमसाठी तयार केलेल्या निकषांचे पालन करू, जेणेकरून ती जागतिक दर्जाची संस्था बनेल, असे केंद्रीय मंत्री वैष्णव यांनी सांगितले.

दीर्घकालीन सहकार्यासाठी मदतीचा हात पुढे करणाऱ्या काही कंपन्यांमध्ये जिओ स्टार ,ऍडोब , गुगल आणि यू-ट्यूब , मेटा , वाकॉम, मायक्रोसॉफ्ट आणि एनव्हीआयडीआयए (छतखऊख) यांचा समावेश आहे.

या समारंभात उपस्थित असलेल्या उद्योजकांमध्ये रिचर्ड केरिस, (उपाध्यक्ष आणि महाव्यवस्थापक मीडिया अँड एंटरटेनमेंट, एनव्हीडिया), संजोग गुप्ता (सीईओ, स्पोर्ट्स अँड लाईव्ह एक्सपिरीयन्सेस, जिओ स्टार), माला शर्मा (उपाध्यक्ष आणि महाव्यवस्थापक - एज्युकेशन, ॲडोब), प्रीती लोबाना (कंट्री हेड आणि उपाध्यक्ष, गुगल इंडिया), राजीव मलिक (वरिष्ठ संचालक, वॅकॉम), संदीप बांदीबेकर (सेल्स प्रमुख, राज्य सरकार आणि आरोग्यसेवा), संदीप बांदीवडेकर (संचालक, मेनस्ट्रीम सर्व्हिसेस पार्टनर्स, मायक्रोसॉफ्ट) आणि सुनील अब्राहम (संचालक, सार्वजनिक धोरण, मेटा) यांचा समावेश होता.

आयआयसीटीचे संचालक मंडळाचे सदस्य आणि नियामक परिषदेचे सदस्य आशिष कुलकर्णी, बिरेन घोष, मानवेंद्र शुकुल, मुंजाल श्रॉफ, चैतन्य चिंचलीकर आणि सुभाष सप्रू आज उपस्थित होते. आयआयसीटीच्या कार्यकारी चमूमध्ये आयआयसीटीचे सीईओ डॉ. विश्वास देवस्कर, आयआयसीटीचे सीईओ निनाद रायकर आणि आयआयसीटीच्या विपणन प्रमुख श्वेता वर्मा यांचा समावेश आहे.

या सत्रादरम्यान आयआयसीटी आणि आघाडीच्या उद्योग भागीदारांचे प्रतिनिधी एकत्र आले आणि त्यांनी इरादा पत्रांचे आदानप्रदान करून भारतातील एव्हीजीसी-एक्सआर परिसंस्थेला चालना देण्याच्या उद्देशाने दीर्घकालीन सहयोगी प्रयत्नांचा शुभारंभ केला. स्वाक्षरी करणाऱ्यांमध्ये जिओस्टार, ॲडोब, गुगल, यूट्यूब आणि मेटा यासारख्या आघाडीच्या जागतिक उद्योग कंपन्यांचा समावेश होता.

ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग, कॉमिक्स, चित्रपट आणि विस्तारित वास्तवात शिक्षण, संशोधन आणि विकास आणि नवोन्मेषाला चालना देण्यासाठी या सहकार्याची रचना केली आहे. भविष्यातील वाढीसाठी एक शाश्वत परिसंस्था विकसित करून सृजनशील आणि डिजिटल मीडिया क्षेत्रात भारताच्या यशस्वी आयटी मॉडेलची प्रतिकृती तयार करणे हे याचे उद्दिष्ट आहे.

केंद्रीय माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन; माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू; आणि पत्र सूचना कार्यालयाचे प्रधान महासंचालक धीरेंद्र ओझा हे करारांच्या आदानप्रदान प्रसंगी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### हॅण्डल लॉक केलेली दुचाकी पळवली

सोलापूर (प्रतिनिधी) हॅण्डल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एम एच.१३.बी.एस.६४३९ ही जुना आरटीओ ऑफिस जवळील अभिजीत मेडिकल जवळेल असलेल्या विद्युत डीपीला लागून पार केलेली असताना अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.ही घटना २० मे रोजी घडली याप्रकरणी विठ्ठल धानप्पा सोनकांबळे (वय-६१,रा.बुधवार पेठ) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल सरतापे हे करीत आहेत.

### भांडण मिटवण्यासाठी गेल्यावर चाकूने मारहाण

सोलापूर (प्रतिनिधी) भांडण मिटवण्यासाठी गेल्यानंतर लाथा बुक्क्यांनी मारहाण करत चाकूने मारून जखमी केल्याची घटना २ मे रोजी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास रमाबाई आंबेडकर नगर येथे घडली.याप्रकरणी नालंदा दिलीप सोनवणे (वय-३२,रा.अक्षत पाम्स डोणगाव रोड) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून सुभ्रजीत लक्ष्मण कांबळे (रा.रमाबाई आंबेडकर नगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेची हकीकत अशी की,फिर्यादी व तिचे पती दिलीप सोनवणे,मुलगी प्रिया कांबळे असे मिळून जावई सुभ्रजीत कांबळे यांच्या घरी सकाळी झालेल्या भांडण मिटवण्यासाठी आले होते.त्यावेळी संशयित आरोपी याने फिर्यादी यांच्या अंगावर चटणीचे पाणी टाकून शिवीगाळ करत हाताने मारहाण केली.त्यानंतर घरात जाऊन घरातील चाकू घेऊन फिर्यादी यांचे पती यांच्या हाताच्या पोटरीवर व कपाळावर मारून जखमी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. सहायक फौजदार ओव्हळ हे करीत आहेत.

### शिवीगाळ करत मारहाण; दोन जणांवर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) किरकोळ कारणावरून शिवीगाळ करत मारहाण केल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना ९ एप्रिल रोजी रात्री दहा वाजता सुमारास मड्डी वस्ती येथे घडली.याप्रकरणी अंजना भगवान भांगे (रा.निराळे वस्ती) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे त्यांच्या फिर्यादीवरून राज्यश्री आनंद मोडेकर व राज गोसावी (रा.मड्डी वस्ती) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

या घटनेची हकीकत अशी की,फिर्यादी यांची नात व नातू यांचा शाळेत पेपर असल्याने ते शाळेतील पेपर देऊन घरी परत आले.त्यावेळी फिर्यादी यांना सांगितले की,फिर्यादी यांची मुलगी राजश्री हिने तुम्ही आमच्या सोबत राहायचे नाही, तुम्ही तुमच्या आजी आजोबाकडे राहायचे असे म्हणून आई व तिच्या सोबत असणारा राज गोसावी याने शिवीगाळ करून हाताने मारहाण करून आजीच्या घरी आणून सोडण्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल साळुंखे हे करीत आहे.

# ‘महाबळेश्वर महापर्यटन’ उत्सवामुळे महाबळेश्वरचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर जाणार : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे



## ‘महाबळेश्वर महापर्यटन’ उत्सवाचे थाटात उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सातारा : महाबळेश्वर येथे आयोजित पर्यटन उत्सवाचे अत्यंत सुंदर, आटोपशीर व नेटके आयोजन केले आहे. आंतरराष्ट्रीय महोत्सवाला साजेसे असे आयोजन असून या महोत्सवामुळे पर्यटन वाढीला निश्चितपणे चालना मिळेल व या पर्यटन उत्सावामुळे महाबळेश्वरचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर जाणार, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व्यक्त केला.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, पर्यटन विभाग महाराष्ट्र शासन यांच्या तर्फे आयोजित दि. २ ते ४ मे या कालावधीत महापर्यटन उत्सव महाबळेश्वरचे आयोजन करण्यात आले आहे. याचे उद्घाटन उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्याहस्ते झाले. या प्रसंगी पर्यटन मंत्री तथा पालकमंत्री शंभूराज देसाई, ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, आमदार तुकारात ताके, पर्यटन विभागाचे महाव्यवस्थापक मनोजकुमार सुर्यवंशी, जिल्हाधिकारी संतोष पाटील, उपवनसंरक्षक आदिती भारद्वाज, प्रभारी पोलीस अधीक्षक वैशाली कडूकर, अपर जिल्हाधिकारी मिल्लार्जुन माने, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विश्वास सिद, पर्यटन विभागाचे संचालक बी.एन. पाटील, प्रांताधिकारी राजेंद्र कचरे, तहसीलदार तेजस्वीनी पाटील, ब्रॅन्ड अँब्यासिटर मृणाली देव-कृलकणी, नवेली देशमुख, जपानचे कॉन्सुलेट जनरल यमाशिता सान आदी उपस्थित होते.

महाबळेश्वर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी आहे. याला ऐतिहासिक वारसा आहे, असे सांगून उपमुख्यंत्री श्री. शिंदे म्हणाले, महाबळेश्वरच्या इतिहासात पहिल्यांदाच असा महापर्यटन उत्सव होत आहे. पर्यटनमंत्री शंभूराज देसाई हे अत्यंत उत्साही असून अतिशय कमी दिवसात या महोत्सवाची केलेली तयारी अत्यंत दर्जेदार आहे. महापर्यटन उत्सवात विविध साहसी उपक्रम आणि सांस्कृतिक कार्यक्रम, किल्ले आणि शास्त्रप्रदर्शनी, फूड फेस्टिव्हल, साहसी खेळांचे उपक्रम, हेलिकॉप्टर यासह विवविध उपक्रम पर्यटकांसाठी राबविण्यात येत आहेत. फुड फेस्टिवलमध्ये विविध चवदार पदार्थ, मिलेटचे पदार्थ, औषधी पदार्थ यांचा समावेश आहे. बचत गटांनी उत्पादीत केलेल्या मालांचे ब्रॅन्डीग व्हावे यासाठी कायम स्वरुपी वितरण व्यवस्था निर्माण केल्यास लाडक्या बहिणी लखपती होतील, असेही त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, पर्यटनाला उद्योगाचा दर्जा दिल्याने मोठ्या प्रमाणावर पर्यटन वाढेल. सातारा जिल्ह्याला पर्यटन हब बनविण्यासाठी जाणीवपूर्वक अधिकाधिक प्रयत्न केले जात आहेत. बामणोली खोऱ्यात केबल पुल बांधण्यात येत आहे. त्यावर विव्हिंग गॅलरी, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्राला जोडणारा पुल, तापोळा तेटली येथे होणारा पुल या सर्वांमुळे पर्यटन वाढीला मदत होणार आहे. लोकाभिमुख, कल्याणकारी अनेक योजना राबविण्यात येत आहेत. परकीय गुंतवणूक आणण्यामध्ये महाराष्ट्र देशात अग्रेसर आहे.

यावेळी त्यांनी महाबळेश्वर राज्यभरात लोकप्रिय पर्यटन स्थळ असून या ठिकाणी पर्यटकांची काळजी घेण्यासाठी, त्यांना सुरक्षीत वातवरण प्रदान करण्यासाठी पर्यटन मंत्री श्री. देसाई यांच्या संकल्पनेतून प्रायोगीक तत्वावर राबविण्यात येत असलेल्या महाराष्ट्र पर्यटक सुरक्षा दलाचा शुभारंभ करुन या उपक्रमाबद्दल श्री. देसाई यांचे कौतुक केले. पर्यावरणाचा ऱ्हास व तपापमान वाढ रोखण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड केली पाहिजे. शेतकऱ्यांसाठी किफायतशिर ठरणाऱ्या बांबु लागवडीला चालना दिली पाहिजे, असेही त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी अनेक राज्ये पर्यटन उद्योगावर चालतात आपल्याकडेही पर्यटनाला खूप वाव आहे. त्याची व्याप्ती अधिक वाढविल्यास पर्यटनाला चालना मिळेल, आंतरराष्ट्रीय पर्यटन स्थळ म्हणून महाबळेश्वरचे नाव जगभरात चमकले पाहिजे यासाठी काम करा, असेही उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

पर्यटन तथा पालकमंत्री श्री. देसाई म्हणाले, सातारा जिल्ह्याचे ब्रॅन्डींग जगभरात करण्यासाठी या महापर्यटन उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोसत्वाच्या आयोजनासाठी जिल्ह्यातील मंत्री महोदयांनी, जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन यांनी मोठ्या प्रमाणावर योगदान दिले आहे. नटलेले, सुशोभित झालेले महाबळेश्वर पहायला मिळत आहे याचा मनस्वी आनंद आहे. सर्वांनी मिळून हा महोत्सव यशस्वी करुया, पर्यटकांच्या सुरक्षतेसाठी पर्यटन सुरक्षा दल निर्माण केले असून प्रायोगिक तत्वावर महाबळेश्वर येथे सुरु करण्यात आलेल्या या उपक्रमाची उपयुक्तता लक्षात घेऊन येत्या काळात पर्यटन सुरक्षा दल उपक्रम राज्यभर राबविण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

ग्रामविकास मंत्री श्री. गोरे यांनी महापर्यटन उत्सवाला शुभेच्छा देत असताना या उपक्रमाबद्दल आणि पर्यटन मंत्री श्री. देसाई यांच्या कलपकतेबद्दल कौतुक केले. महाबळेश्वर, कोयनेचा परिसर अत्यंत सुंदर आहे. कोकणाला जोडणारा पुल तयार होत असल्याने याचा फायदा पर्यटन वाढीला निश्चतपणे होणार असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी फुड फेस्टीवल फ्ली बाजार, कीड्स झोन, वेण्णा लेख येथील तरंगता बाजार, प्रतापसिंह उद्यान आदी ठिकाणी भेटी दिल्या. गोल्फ क्लब येथे उभारण्यात आलेल्या टेंट सिटीचे उद्घाटन केले. सुरक्षा दलाचा शुभारंभही उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केला.

## आरोग्य क्षेत्रात समाज विकास संस्थेचे कार्य उल्लेखनीय




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा /प्रतिनिधी

उमरगा येथील समाज विकास संस्थेच्या वतीने गेली दीड वर्षांमध्ये जनरल ड्युटी असिस्टंट नावाचा कोर्स सुरू आहे.या कोर्सच्या माध्यमातून दर तीन महिन्याला एक स्वतंत्र बॅच प्रॅक्टिससाठी बाहेर पडते. सहा महिन्याच्या कोर्सनंतर प्रत्येक बॅचमध्ये तीस ते पन्नास युवक प्रशिक्षण घेऊन बाहेर पडतात.

आज गेली दीड वर्षांमध्ये किमान २०० मुलीनी जनरल ड्युटी असिस्टंट कोर्स पूर्ण केला आहे लोहारा उमरगा तालुक्यातून या मुलींनी आपले आरोग्य क्षेत्रात खूप चांगले स्थान मिळविले आहे.उमरगा, लोहारा, मुरूम शहरातील प्रत्येक दवाखान्यामध्ये आज मुलींना नोकरी मिळाली आहे. आरोग्य क्षेत्रातील कार्य आणि सामाजिक बदलाचे खूप मोठे कार्य समाज विकास संस्था करत असल्याचे प्रशिक्षिका/ प्राचार्य डॉक्टर कल्पना वाघ ( खोबरे) यांनी पत्रकारांना माहिती देताना सांगितले. पुढे त्या म्हणाल्या की सहकारी, निम सहकारी आणि खाजगी दवाखान्यामध्ये बऱ्याच वेळा प्रशिक्षित स्टाफ मिळत नव्हता. परंतु हे सेंटर सुरू झाल्यापासून प्रत्येक हॉस्पिटलमध्ये आता प्रशिक्षित स्टाफ कार्यरत असल्याचे समाधान व्यक्त केले.

स्थानिकच्या हॉस्पिटलचे डॉक्टर आवर्जून गरज पडेल तेव्हा स्टाफच्या संदर्भात समाज विकास संस्थेस संपर्क करत आहेत.आणि प्रत्येक मुलीला आज नोकरी लागत आहे. हे कार्य करण्यासाठी वात्सल्य ट्रस्ट कांजूरमार्ग मुंबई चे कार्यकारी मंडळ (विश्वस्त ) यांचे विशेष सहकार्य लाभत असल्याचे संस्थेचे कार्यवाह भूमिपुत्र वाघ यांनी सांगितले.. तसेच समाजातील दहावी बारावी पास युवा युती यांनी जनरल ड्युटी असिस्टंट या कोर्सचा लाभ घ्यावा. नवीन ॲडमिशन साठी ९१ ७२ ९७ २४ ८२ यावरती नक्की संपर्क करावा असे आवाहन केले आहे.

## जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा माळकरंजाचा कलादर्पण महोत्सव उत्साहात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा माळकरंजा या शाळेने नरसिंह जयंती निमित्त दिनांक २ मे २०२५ रोजी सायंकाळी साडेसात वाजता शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा गुणगौरव पर कार्यक्रम कलादर्पण २०२५ अतिशय देखण्या स्वरूपात सादर केला. कार्यक्रमाचे उद्घाटन गावचे प्रथम नागरिक तथा सरपंच श्री विजय व्यंकटराव शिंदे , शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री शरद गालट, गावातील प्रतिष्ठित नागरिक श्री तांबे दादा, बाळासाहेब लोमटे, तंटामुक्ती अध्यक्ष श्री सारंग पोलिस पाटील विशाल टिंगरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी केंद्रांतर्गत घटक शाळेचे मुख्याध्यापक श्री चटलेवाड सर, श्री बाळकृष्ण कुंभार सर, श्री सुरेश निर्फळ सर, श्री चंद्रशेखर पाटील सर हेही कार्यक्रमास आवर्जून उपस्थित होते.

शाळेतील बालकांनी सदर कार्यक्रमात विविध पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक प्रश्नावर विविध गीते व प्रसंग सादर करून उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली. छत्रपती शंभू महाराजांच्या फितुरीने केलेल्या हत्येचा हृदयद्रावक प्रसंग, रामायणामधील सीतेचे हरण, आणि महाभारतातील द्युत खेळत असताना द्रौपदीचा कौरवाकडून झालेला अपमानास्पद प्रसंग याबाबतच्या पौराणिक आणि ऐतिहासिक घटना प्रेक्षकांच्या डोळ्यासमोर साक्षात उभ्या राहिल्या.

नव्या जुन्या चित्रपटातील अविट गोड गाणी, बाई पण भारी देवा तसेच देशभक्तीपर गीते आणि दक्षिणात्य गीते यामधून उपस्थित बालके, महिला ,तरुण वर्ग व सर्वांचीच मने जिंकली. सुमारे साडेचार तास झालेल्या या कार्यक्रमास आजूबाजूच्या गावातील प्रेक्षकही उपस्थित राहिले.( यावेळी शाळेतील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांचा सत्कार उपस्थित प्रेक्षकांसमोर गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आला. चिरंजीव श्लोक हनुमंत घाडगे या विद्यार्थ्यांची निवड सैनिकी स्कूल तुळजापूर येथे तर कुमारी मंजुषा लोमटे व ज्ञानेश्वरी कवडे या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत पात्रता धारक झाल्यामुळे आणि कुमारी शरण्य ठाकूर हिंदवी माने स्वरांजली माने यांनी मंथन टॅलेंट सर्च या परीक्षेत यश मिळविल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास गावातील अबालवृद्धांनी मोठ्या प्रमाणात हजेरी लावली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपक्रमशील शिक्षक श्री हनुमंत घाडगे यांनी केले. श्रीमती भारती सूर्यवंशी ,श्रीमती मंजुषा कराड , मकरंद नाडे, गणेश तपिसे,शाळेच्या माजी शिक्षिका समीना बागवान,चंद्रशेखर पाटील, मयुर क्षिरसागर यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शाळेचे मुख्याध्यापक तथा राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाचे राज्य सरचिटणीस श्री संतोष भोजने यांनी केले.

### हाताला काळी पट्टी बांधून फलक दाखवून तिव्र निषेध

### पाकिस्तान मुर्दाबादच्या दिल्या घोषणा

# पेहेलगाम येथील हल्ल्याचा निफाड तालुका मुस्लिम समाजातर्फे जाहीर निषेध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

काश्मीरमधील पेहेलगाम येथे दहशतवादी हल्लात २७ भारतीय निरपराध पर्यटक व स्थानिक नागरिकांचा बळी गेला या हल्ल्याचा निषेध करण्यासाठी निफाड मुस्लिम बांधवांनी हाताला काळीपट्टी बांधून निषेध मोर्चा काढला. शुक्रवारची नमाज नंतर एकत्रित येऊन पाकिस्तानचा व दहशतवाद्यांचा निषेध करण्यासाठी व पाकिस्तानाला केंद्र सरकारने भ्याड हल्ल्या बद्दल आद्दल घडवावी व निरपराध लोकांच्या हत्येचा बदला घ्यावा .अशी मागणी केली.त्याच बरोबर काही व्यक्ती कडून ह्या अतिरेकी हल्ल्याचा संबंध भारतीय मुस्लिम समाजाशी जोडून मुस्लिम समाजाला टार्गेट करण्याचा प्रयत्न करत आहेत याचाही निषेध करण्यात आला . कारण असे करुन हे लोकं एका प्रकारे शत्रु राष्ट्र पाकिस्तानलाच मदत करत आहेत . कारण या हल्यावरून हे स्पष्ट दिसते की पाकिस्तानचा उद्देश दोन्ही धर्मा मध्ये मतभेद माजवून भारतात कायम अशांतता राहावी असाच आहे




यावेळेस मुस्लिम बांधवांनी पाकिस्तान मुर्दाबाद आतंकवाद मुर्दाबाद असे फलक हातात घेतले होते. मोर्चा निफाड जामा मस्जिद ते निफाड पोलिस स्टेशन पर्यंत काढण्यात आला. पोलिस निरीक्षक गणेश गुरव यांना निवेदन देण्यात आले.

याप्रसंगी मौलाना अहेमदअली, दिलावर तांबोळी, आसिफ पठाण,इरफान सय्यद , शकील पठाण, तनवीर राजे, अशपाक पठाण, नूर शेख,सलीम इनामदार ,फकीर शेख , इमाम कुरेशी ,आसिफ पिंजारी ,रशीद पठाण , हाजीमलंग फकीर, अय्युब पठाण, शब्बीरखान पठाण, नवीद मणियार, अबिद पठाण, वसीम पठाण, नबी शेख , अमजद शेख, हसन शेख ,नईम पठाण ,बालम इनामदार, असलम पठाण, असलम शेख इतर सदस्य मुस्लिम बांधव उपस्थित होते

तरुणांनी निषेध करण्यासाठी लक्षणीय उपस्थित दर्शवली परत असे हल्ले सहन केले जाणार नाही व भारत सरकारच्या कारवाई आमचा पूर्ण पाठिंबा आहे असे सांगितले.

## पुणे जिल्ह्यात एक गाव एक पोलीस पाटील, एक पोलिस अंमलदार सुरक्षित पुणे ग्रामीण योजना सुरू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ विनायक गायकवाड

पुरंदर : एक गाव एक पोलीस एक पोलीस पाटील ही महत्त्वाकांक्षा योजना जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली एक मे २०२५ पासून सुरू झाली आहे.



पुणे जिल्ह्यामध्ये एकूण १३ तालुके व ३३ पोलीस स्टेशन आहेत तसेच १५ ७४ पोलीस ठाणे अंतर्गत येणारी गावे आहेत व १२ ९२ एकूण पोलीस पाटील संख्या आहे. तसेच १५२४ पोलीस कर्मचाऱ्यांची संख्या आहे. सुरक्षित पुणे ग्रामीण पच्या माध्यमातून' पोलीस पाटील आणि पोलीस कर्मचाऱ्यांची नोंदणी केली असून त्यामुळे गावातील दैनंदिन घडामोडी कायदा व्यवस्थेचे प्रश्न सोडवताना विविध भागांना भेटी देता येणार आहेत,ग्रुपच्या माध्यमातून संबंधित पोलीस ठाण्याचे प्रमुख वरिष्ठ पोलीस अधिकारी गावागावातील घडामोडीवर लक्ष ठेवणार आहेत, दर आठवड्यात दहा दिवसाच्या कालावधीवर पोलीस पाटील,पोलिस आमदारांनी विविध घटकांची माहिती सुरक्षित पुणे ग्रामीण ऍपवर टाकण्याचे आदेश देण्यात आले आहेत, प्रत्येक गावातील वार्ड प्रमाणे मॅप तयार करण्यात येणार आहे पोलीस पाटील व अंमलदार यांनी भेट देताना जिओ टॅग लोकेशन फोटो ऍपवर टाकणे आवश्यक आहे.

.पोलिसांशी विश्वास पूर्ण वातावरण तयार व्हावे तसेच महिला व बालकांच्या गुन्ह्यात विलंब न होता तात्काळ कारवाई होऊन न्याय देता यावा हा खरा उद्देश ह्या योजनेचा आहे.

जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील विविध गावातील ग्रामस्थ आणि पोलिसांमध्ये संवाद वाढवा तसेच गंभीर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी सुरक्षित पुणे ग्रामीण प च्या माध्यमातून ही योजना सुरू केली आहे. अशी माहिती मा पंकज देशमुख साहेब जिल्हा अधीक्षक पुणे ग्रामीण यांनी दिली.

थोडक्यात...




## श्री सिद्धेश्वर देवाच्या आशीर्वादाने घोसरवाडची खीर प्रसिद्ध

टाकळीवाडी : घोसरवाड तालुका शिरोळ येथील जागृत देवस्थान श्री सिद्धेश्वर महाराजांच्या आशीर्वादाने गव्हाची खीर प्रसिद्ध आहे.

वालुग असो किंवा पुजारी वाढण्याचा कार्यक्रम असो गव्हाची खिरीचा मान आहे. घोसरवारची खीर म्हणजे जणू देवाचे अमृत असे मानले जाते. चवीला स्वादिष्ट अशी खीर बनवण्याची प्रथा घोसरवाड मध्ये पिढ्यान पिढ्या चालत आली आहे. नरसोबावाडी चा पेढा, खिद्रापूरचे कोपेश्वर मंदिर, महालक्ष्मी साठी कोल्हापूर, ज्योतिबासाठी वाडी रत्नागिरी, याचबरोबर आता घोसरवाड ची खीर प्रसिद्ध आहे.

या गावांमध्ये एक वेगळीच प्रथा आहे. वालुग मध्ये सर्वप्रथम पुजारी यांना मान दिला जातो. त्यानंतर समस्त भक्त मंडळ गावकरी हे वालुग मध्ये प्रसाद घेतात. पोट भरून प्रसाद घेतल्यानंतर घरला सुद्धा प्रसाद देण्याची प्रथा आजतागायत सुरू आहे. पंचक्रोशीतील प्रत्येक समाजातील भक्तमंडळी या प्रसादाचा आनंद घेत असतात. अनेक भक्त लोक बोलतात की खीर खावी तर घोसरवाडचीच सध्या वालुग व पुजारी वाढण्याचा हा कार्यक्रम सध्या मोठ्या उत्स-ाहात सुरू आहे.

# स्पर्धा परीक्षांची तयारी शालेय वयातच झाली पाहिजे

## शिक्षणाधिकारी सचिन जगताप; विवेकानंद प्रज्ञाशोध परीक्षेच्या पारितोषिक वितरण समारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आजच्या आधुनिक युगामध्ये प्रत्येक क्षेत्रात मोठी स्पर्धा निर्माण झाली आहे, कोणत्याही स्पर्धेत टिकण्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागते व स्पर्धेला सामोरे जाण्याची तयारीही अस-ावी लागते म्हणूनच स्पर्धा परीक्षांची तयारी शालेय जीवनापासूनच करायला हवी आहे. असे प्रतिपादन सोलापूर जिल्हा परिषदेचे माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी व्यक्त केले. ते विठाई बहुउद्देशीय सामाजिक व शैक्षणिक संस्थेच्या वतीने आयोजित विवेकानंद प्रज्ञाशोध परीक्षेच्या पारितोषिक वितरण समारंभात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेच्या महिला व बाल विकास विभागाचे जिल्हा कार्यक्रमाधिकारी प्रसाद मिरकले साहेब उपस्थित होते.

विठाई संस्थेच्या वतीने घेण्यात आलेल्या विवेकानंद प्रज्ञाशोध परीक्षेच्या पारितोषिक वितरण समारंभात पुढे बोलताना सचिन जगताप म्हणाले, प्रत्येकाला यश मिळावे असे वाटते परंतु यशस्वी होण्यासाठी सातत्याने वाचन करणे आवश्यक आहे, आत्मविश्वास कमावणे गरजेचे आहे, यश - अपयशाचा विचार न करता पुढे जात राहणे महत्त्वाचे आहे, माहितीपेक्षा ज्ञानाला महत्त्व दिले गेले पाहिजे या गोष्टींच्या बळावरच आपण यशस्वी होऊ शकतो. याप्रसंगी बोलताना प्रसाद मिरकले साहेब म्हणाले की, स्पर्धा परीक्षांचे महत्त्व कितीही असले तरीही स्पर्धा प्रथम स्वतःबरोबरच आपल्याला करावी लागते. दक्षिण भार-तातील अनेक राज्ये अशा स्पर्धा परी-क्षांमध्ये शालेय जीवनापासून तयारी करून घेतात, त्यामुळे येथील युवक व विद्यार्थी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी होताना दिसून येतात. आपण स्पर्धेत यशस्वी व्हावे असे वाटणे साहजिक आहे परंतु त्यासाठी कष्टाची तयारी हवी.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला रवींद्र ओहोळ यांनी उपस्थितांचे स्वागत केले. डॉ.सचिन लादे यांनी आपल्या प्रास्ताविकातून विवेकानंद प्रज्ञाशोध परीक्षेची गरज व भविष्यात निर्माण होणाऱ्या विवेकानंद स्पर्धा परीक्षा कॅडमीची माहिती दिली. उपस्थित मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी अरिहंत पब्लिक स्कूलचे संस्थापक सचिव उज्वल दोशी व विठाई संस्थेचे मार्गदर्शन डॉ.आनंद भिंगे यांनी मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमांमध्ये प्रमुख अतिथींच्या हस्ते विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. शेवटी आभार श्रीम. महानंदा डोंबाळे यांनी मानले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोमनाथ गायकवाड यांनी केले. या कार्यक्रमाच्या प्रसंगी अरिहंत पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका लोखंडे मॅडम, विद्या विकास मंडळ प्राथमिक विद्यालय मुख्याध्यापक महादेव कांबळे, ज्ञानेश्वर मोरे, नितीन करंडे, राहुल आर्वे, संजय कुलकर्णी, सुन-ील जगताप, शहाजी देशमुख, सिद्धार्थ ढवळे, डॉ.क्षितिजा कदम - पाटील, प्रा.गोविंद भोसले, तुकाराम खंदाडे, एकनाथ सुतार, डॉ अतुल आराध्ये, आनंद नगरकर आदी मान्यवर उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे संचालक शशिकांत घाडगे सर, राम मोरे, अनिल घाडगे, ऍड. कीर्ती मोरे, कविता गायकवाड, उदयसिंह वाघमारे, अर्चना वाघमारे, महानंदा डोंबाळे, प्रसाद कोत्तूर, संजय टोणपे, अंजली लादे, माया कुलकर्णी, मोनिका जाधव यांनी परिश्रम घेतले.



# शिवानंद वाकदकर यांचा आदर्श तलाठी पुरस्काराने गौरव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : महाराष्ट्र शासनाच्या वतीने दिला जाणारा जिल्हास्तरीय आदर्श ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) पुरस्कार सन २०२४-२५ साठी शेंदुर्जन भाग १ (ता. सिंदखेडराजा) येथील ग्राम महसूल अधिकारी श्री. शिवानंद वाकदकर यांची निवड झाली आहे. आज महाराष्ट्र दिनाच्या ध्वजारोहण कार्यक्रमात राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री मा. श्री. मकरंद जाधव यांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**पालकमंत्री मकरंद जाधव यांच्या हस्ते पुरस्काराने सन्मानित**

जिल्हाधिकारी श्री. किरण पाटील आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गुलाबराव खरात यांच्यासह अनेक मान्यवर या सोहळ्याला उपस्थित होते. पुरस्कारामध्ये सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र आणि ५०००/- रुपये रोख यांचा समावेश आहे.

मागील दहा वर्षांच्या शासकीय सेवेतील उत्कृष्ट कामाचे मूल्यमापन करून श्री. वाकदकर यांना हा पुरस्कार मिळाला आहे. त्यांनी शिंदी, कंडारी, ढोरवी आणि शेंदुर्जन भाग-१ या साजांमध्ये उत्कृष्ट काम केले. कोरोना काळात त्यांनी 'प्रशासन आपल्या दारी' आणि लसीकरण मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला.कोरोना काळातच कार्यालयातील गर्दी टाळण्यासाठी त्यांनी गुगल फॉर्मद्वारे अर्ज स्वीकारण्याची व घरपोच सातबारा देण्याची सोय सुरू केली. शेतकऱ्यांसाठी ई पीक पाहणीची माहिती देणारे युट्युब व्हिडिओ बनवले आणि सहकारी तलाठ्यांसाठी पैसेवारी रजिस्टरचा नमुना तयार केला. त्यांनी लोकसहभागातून शेतरस्ते खुले करण्यासाठीही प्रयत्न केले. सांस्कृतिक कार्यक्रमातही त्यांनी उत्कृष्ट सूत्रसंचालन आणि अभिनयाचे प्रदर्शन केले. विविध शासकीय योजना प्रभावीपणे राबवणे, नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू करणे आणि शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करणे यांसारख्या त्यांच्या कार्याची यापूर्वीही दखल घेण्यात आली आहे. राज्यस्तरीय फेरफार तज्ञ समितीमध्ये सातबारा संगणकीकरण आज्ञावली सुधारण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

विदर्भ पटवारी संघाचे सचिव असलेले श्री. वाकदकर सध्या शेंदुर्जन येथे कार्यरत आहेत. एक उत्कृष्ट वक्ता आणि संघटक म्हणून ते ओळखले जातात. हा पुरस्कार त्यांच्या कामाची पावती असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. त्यांच्या या कार्याबद्दल सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

# आजपासून पंढरपुरात बालनाट्य अभियान प्रशिक्षण शिबिर




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मुंबई, गुरु स्कूल गोफान पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने बाल नाट्य अभियान प्रशिक्षण शिबिर आज पासून सुरू करण्यात आले.

पंढरपूर आणि पंढरपूर परिसरातील आठ ते पंधरा वयोगटातील मुला मुलींसाठी खास उन्हाळ्याची सुट्टी मजेत घालवण्यासाठी आणि लहान वयातच अभिनय आणि वाचा शुद्धी शिकवण्याची संधी व यावर्षी नाट्यपरिषद पंढरपूर शाखा या गुरुकुल तुफान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन केले असून आज दिनांक तीन मे ते १२ मे २०२५ या कालावधीत सकाळी नऊ ते दुपारी एक वाजेपर्यंत असणारा आहे तरी इच्छुक पालकांनी या संधीचा लाभ घेऊन आपल्या मुलांच्या अंगी असणाऱ्या कलागुणांना वाव देण्यासाठी पुढील पिढी घडवण्यासाठी आपण आपल्या पाल्याची संधी देऊन त्यांच्या अंगी असलेल्या कलेच्या सुप्त गुणांना जागृत करण्याची तसेच भविष्यातील एक उत्तम कलाकार उत्तम नड बनवण्यासाठी शिबिरात सहभाग असणे आवश्यक आहे या शिबिरांमध्ये अभिनय, मृत्यू, व्यक्तिमत्व विकास, लेखन, दिग्दर्शक, रंगमंच तंत्र, रेखांचा वेद संवाद कौशल्य अशा अशक्य पैलूंना आजमावणे हा प्रशिक्षण घेण्यामागचा हेतू आहे.

यासाठी प्रशिक्षक आणि मार्गदर्शक म्हणून महासंचालक मिलिंद केळकर पाहणार आहेत या मान्यवरांच्या हस्ते नटराज पूजन करण्यात आले सदर प्रशिक्षण संचालक देवदत्त पाठक विनायक मंडळ सदस्य दिलीप कोरके उपाध्यक्ष दत्तात्रय जगताप सहकार्य वाहक राजू वराडे नाट्य प्रदेश शाखा पंढरपूरचे नवीन शेवडे यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला व सूत्रसंचालन रवींद्र शेवाळे यांनी केले महासंचालक मिलिंद केळकर यांनी मार्गदर्शन केले व आभार राजू वराडे यांनी मानले.

# कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




पंढरपूर/प्रतिनिधी : रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात नुकताच माजी विद्यार्थी मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला. या मेळाव्याचे अध्यक्षस्थान वसंतनाना देशमुख यांनी भूषवले.

प्रभारी प्राचार्य डॉ समाधान माने यांनी त्यांच्या मनोगतामध्ये महाविद्यालयाच्या शैक्षणिक आणि संशोधनातील प्रगतीचा आढावा घेतला आणि सुरू असलेल्या विविध कोर्सेस आणि उपक्रमांची माहिती दिली. सोलापूर जिल्ह्यातील अग्रगण्य समजल्या जाणाऱ्या या महाविद्यालयाने ६५ वर्षांचा यशस्वी प्रवास पूर्ण केला आहे. समाज जीवनाच्या विविध क्षेत्रात योगदान देणाऱ्या असंख्य विद्यार्थ्यांचा घडवणारा हा शिक्षण मंदिराचा मेळावा संस्मरणीय ठरला. या प्रसंगी बोलताना मान्यवरांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचा गौरव करत, भविष्यात माजी विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागातून संस्थेचा विकास अधिक व्यापक करण्याची गरज अधोरेखित केली.

यावेळी रयत शिक्षण संस्थेचे सेवानिवृत्त सचिव आणि माजी प्राचार्य डॉ. जे. जी. जाधव यांचीही उपस्थिती लाभली. कार्यक्रमात दिलीप कोरके यांनी भविष्यातील मेळावा भव्य दिव्य करण्याचे मान्य केले, स्नेहल राऊळे यांनी आपल्या शैक्षणिक कार्यात महाविद्यालयाचे योगदान अधोरेखित केले, डॉ. जयश्री भोसलेयांनीपदवीआणिपदव्युत्तरपदवीशिक्षणासाठी महाविद्यालयाने केलेले सहकार्य आणि आपल्या व्यक्तिमत्त्वाचा झा-लेला विकास याबाबी सांगितल्या, लक्ष्मी यादव यांनी शिक्षकांनी केलेले विशेष मार्गदर्शन, दिलेले प्रोत्स-ाहन याविषयीच्या आठवणी सांगितल्या, समाधान काळे यांनी आपल्या राजकीय व्यक्तिमत्त्व जडणघडणीत महाविद्यालयाने दिलेली संधी या गोष्टींचा उहापोह केला. प्रतीक्षा वाघमोडे यांनी कविता वाचन करून शिक्षकां प्रति आदर व्यक्त केला, डॉ. फैमिदा विजापुरे यांनी विद्यार्थी दशेतील आठवणी जाग्या केल्या, सागर पडवळ, प्रा. आर. डी. पवार यांनी आ-पली मनोगते व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुशील कुमार शिंदे यांनी केले तर प्रभारी प्राचार्य डॉ. समाधान माने यांनी उपस्थितांचे स्वागत केले. रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य ज्योतिराम भायगुडे, उपप्राचार्य डॉ. तुकाराम अनंतकवळस, पत्रकार जैनुद्दीन मुलाणीतसेच विविध क्षेत्रात कार्यरत माजी विद्यार्थी व प्राचार्य डॉ. टी. एन. लोखंडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अमर कांबळे व डॉ. भारती सुडके यांनी केले. तर कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे आभार डॉ. दादासाहेब हाके यांनी मानले. माजी विद्यार्थ्यांच्या पुढाकारातून महाविद्यालयाचा विकास अधिक भक्कमपणे घडवण्याचा निर्धार या मेळाव्यातून व्यक्त झाला.

**औसा तालुक्यातील हरेगाव येथील ऐश्वर्या सतीश कोव्हाळेचा प्रेरणादायी प्रवास**

**हरेगाव ग्रामपंचायतने केला सत्कार**

# हरेगावच्या शेतकऱ्यांची मुलगी ऐश्वर्या कोव्हाळे झाली डॉक्टर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा/अमर जाधव :

औसा तालुक्यातील हरेगाव येथील सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात जन्माला आलेली ऐश्वर्या कोव्हाळे ,ऐश्वर्या कोव्हाळे यांचे वडील हरेगाव येथील शेतकर सतिश कोव्हाळे हे गेल्या तीस वर्षपुर्वी सतत नापिकी व शेतीमालाला नसलेला भाव यातुन शेती करुन आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे शक्य नसल्याने

गेल्या तीस वर्षापुर्वी सतिश कोव्हाळे यांनी पुणे येथे जाण्याचा निर्नय घेतला व पुणे येथे कंपणीत कामाला लागले ,त्यानंतर आपला संघर्षमय असलेला जिवन प्रवास




आपल्या मुलांच्या वाट्याला येउ नये मनुन मुलांना उच्चशिक्षीत करण्याचा निर्नय घेतला ऐश्वर्याचे वडील सतिश कोव्हाळे व आई वर्षाताई कोव्हाळे यांनी ऐश्वर्याला डॉक्टर करण्याचे स्वप्न पाहीले व ऐश्वर्यानी राञीचा दिवस करत आभ्यास केला व जिद्ध ,चिकाटी ,मेहणतीने वैद्यकीय क्षेञात नाव कमावत बि,एच ,एम ,एस डॉकटरी पदवी पास होउन आपल्या कष्टकरी आई बाबांचे स्वप्न पुर्ण केले .ऐश्वर्या यांच्या घरी कुटलाही शिक्षणाचा वारसा नसताना संघर्षमय परिस्थीतीत अभ्यास करुन ऐश्वर्या डॉक्टर झाल्याने कोव्हाळे कुटुंबात व हरेगाव गावात आनदाचे वातावरण निर्मान झाल्याचे सरपंच संजय पवार यांनी सांगीतले .यावेळी

सरपंच संजय पवार उपसरपंच राजेंद्र मुडबे ,सुरेश मुडबे,निवृती कोव्हाळे ,नामदेव कोव्हाळे करण कोव्हाळे ,नवनाथ कोव्हाळे प्रशांत कोव्हाळे ,रुषीकेश मुडबे,काका पवार ,दत्त-ाञय कोव्हाळे कारभारी ,गणेश डोंगरे ,संदिपान पवार ,सुधिर कोव्हाळे ,प्रशांत शिंदे,सुर्यकांत बरगांडे ,सुनिल भालेकर ,उद्योजक आशोक जाधव ,नविव भालेकर ,जितेंद्र डोंगरे ,सचीन डावरे शिवाजी ताकभाते,बालाजी दाजी.नितीन बेगडे वैभव शिंदे रुतुराज पाटील श्रीपती निंगदाळे ,विशाल गराडे,विठ्ठल भालेकर ,राहुल भालेकर ,शंकर भालेकर ,अरविंद कोव्हाळे ,गोविंद निरटले ,शालुबाई डोंगरे,अर्चना बेरड अनिता गाडेकर , अनुराधा सवने ,सह हरेगाव ग्रामस्थांनी ऐश्वर्या कोव्हाळे यांचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

# श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या चरणी सोन्याची तुळशी माळ अर्पण



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीस श्रीमती अलका अंकुश घाडगे रा. आनंदनगर टाकळी रोड, पंढरपूर यांनी श्रींच्या चरणी सुमारे ५ लक्ष किमतीची सोन्याची तुळशी माळ अर्पण केल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

त्याबद्दल देणगीदार यांचा सत्कार मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा व उपरणे देऊन करण्यात आला. यावेळी देणगीदार यांचे कुटुंब उपस्थित होते.

या सोन्याच्या तुळशी माळेला ४३ पाने व ८८ व्हर्टिकल मनी आहेत. त्याचे अंदाजे वजन ६०.७८ ग्रॅम असून, ५ लक्ष १४ हजार इतकी किंमत होत आहे. देणगीदार हे पंढरपूर येथील रहिवासी असून श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे निस्सिम भक्त आहेत.

सोने चांदी देणगी स्वीकारण्यासाठी स्वतंत्र विभाग आहे. त्यासाठी अनुभवी व तज्ञ सराफाची नियुक्ती करण्यात आली आहे. सोने-चांदी देणगी देणाऱ्या भाविकांना संगणकीय प्रणाली द्वारे पावती देण्यात येते. इच्छुक भाविकांनी मंदिर समितीच्या कार्यालयात संपर्क करावा असे आवाहन मंदिर समितीच्या वतीने यावेळी श्री श्रोत्री यांनी केले.